
कोकण उद्योजक प्रतिष्ठान (रजि.)

KOKAN UDYOJAK PRATISHTHAN

# कोकण दूत

## समृध्द कोकण अभियान


पाणी


पर्यटन


प्रगत शेती


मत्स्योद्योग


प्रक्रिया


पर्यावरण

समृध्द कोकण


कृषी व ग्रामीण पर्यटन


प्रशिक्षण



www.kokanclub.org
www.globlakokan.org
www.kokangreenlife.org

KOKAN BHUMI PRATISHTHAN

# प्रास्ताविक...

देशाचा सर्वात समृध्द प्रदेश म्हणजे कोकण. ७०० किमीचा समुद्र किनारा तितकाच मोठा सह्याद्री यामध्ये वसलेली ही परशुरामाची पवित्र भूमी. परमेश्वराने कोकणाला सर्व काही दिले आहे. नितांत सुंदर समुद्र किनारे, खळाळणाऱ्या नद्या, बॅकवॉटर, जंगल, भरपूर जैवविविधता, वन्यजीवन, ५००० वर्षाचा इतिहास, समृध्द लोकसंस्कृती, ग्रामीण जीवन, खाद्यसंस्कृती, पुरातन मंदिरे, किल्ले, जलदुर्ग, भारताची सर्व रुपे कोकण प्रदेशात पाहायला मिळतात.

श्रीमंत कृषी उत्पादन हापूस आंबा, काजू, मत्स्यसंपत्ती, मसाला पिके, खनिज संपत्ती, निसर्गाची सर्व श्रीमंती कोकणात असून देखील कोकण हा मागासलेला प्रदेश म्हणून ओळखला जातो. या सर्व साधन संपत्तीचे नीट नियोजन केले, विकासाची दिशा निश्चित केली, सर्व कर्तृत्ववान कोकणवासीय संघटीत झाले, तर देशातीलच नव्हे, जगातील एका समृध्द प्रदेशाची निर्मिती होऊ शकेल. याच ध्येयाने समृध्द कोकणचे काम सुरु झाले आहे.

गेली १५ वर्षे डहाणूपासून वेंगुर्ल्यापर्यंत व जव्हारपासून दोडामार्गपर्यंत सर्व कोकणवासियांना संघटीत करण्याचे काम समृध्द कोकण करत आहे. जात-पात, पंथ-भेद-पक्ष, जिल्हा तालुका हे सर्व विसरुन सर्व कर्तृत्ववान कोकणवासियांनी एकत्र यावे व कोकण विकासासाठी प्रत्यक्ष कृती करावी, एकमेकांना सहकार्य करुन आपला स्वतःचा, गावाचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा पर्यायाने कोकणाचा विकास करावा. याकरिता संघटीत अभियान सुरु झाले आहे. कोकणातील गावागावांत कृषी, फलोद्यान, फळप्रक्रिया, पर्यटन, ग्रामीण पर्यटन, मत्स्यशेती असे हजारो प्रकल्प उभे रहावेत व यातून लाखो तरुणांना कोकणातच रोजगार मिळावा. संपूर्ण कोकण मनिऑर्डर मुक्त व्हावा, याकरिता एक संघटीत अभियान प्रतिष्ठान चालवत आहे. यासाठी कोकण व्हिजन परिषदा, कार्यशाळा, प्रशिक्षण शिबिरे, अभ्यासदौरा, आदि कार्यक्रम करतो.

**कोकणातील कर्तृत्ववान व्यक्तींना तरुणांना एकाच व्यासपिठावर आणून निसर्ग समृध्द कोकणाला आर्थिक समृध्द करण्यासाठी सुरु झालेली चळवळ म्हणजेच समृध्द कोकण अभियान**

मागील १० वर्षात कोकण विकासाची प्रक्रिया वेगाने सुरु झाली. भारताची आर्थिक राजधानी कोकणात आहे. शिवडी-न्हावा सी लिंक, मुंबई-गोवा चौपदरीकरण आणि नॅशनल हायवे ६६ म्हणून मान्यता, पनवेल, रत्नागिरी-चिपी, एअरपोर्ट, पर्यटनाचा महामार्ग कोस्टल हायवे, मुंबई - अलिबाग - वेंगुर्ला, जलवाहतूक, कोकण रेल्वेचे दुपदरीकरण यामुळे संपूर्ण कोकण मुंबईशी व जगाशी वेगाने जोडले जाणार आहे. **तज्ज्ञांच्या मते पुढील ५० वर्ष कोकणची आहेत. या विकासाच्या प्रक्रियेत स्थानिक कोकणवासीय भूमीपुत्रांनी सहभागी व्हावे. याकरिता समृध्द कोकणचे अभियान सुरु झाले आहे.**

समृध्द कोकण हे कोकणच्या सर्वांगीण विकासाचे संघटीत अभियान व लोकचळवळ आहे. निसर्ग समृध्द कोकणला आर्थिक समृध्द करण्यासाठी विविध उपक्रम या चळवळीच्या माध्यमातून आम्ही राबवित आहोत. पर्यटन, कृषी व ग्रामीण पर्यटन, आधुनिक शेती, हापूस आंबा, फलोद्यान, फळप्रक्रिया, मत्स्योद्योग, वनौषधी, वनसंपत्ती कोकणातील समृध्द साधन संपत्तीचा उपयोग करून पर्यावरणपूरक असंख्य स्वयंरोजगाराचे प्रकल्प कोकणात गेल्या १० वर्षात या चळवळीच्या माध्यमातून सुरु झाले आहेत. कोकण व्हिजन-२०२५ हा कोकण विकासाचा आराखडा आम्ही तयार केला आहे. पुढील १०-१५ वर्षात विविध विषयात कोकणचा विकास कशा प्रकारे करता येईल याचा विकास आराखडा तज्ज्ञांच्या मदतीने तयार झाला आहे. **मुंबईतील 'ग्लोबल कोकण' हा आंतरराष्ट्रीय महोत्सव, कोकण व्हिजन २०२० परिषदा, विविध संमेलने, प्रशिक्षण शिबिरे, अभ्यासदौरे या माध्यमातून कोकणवासियांची मानसिकता बदलणे आणि प्रत्यक्ष प्रकल्प उभारण्यासाठी उद्युक्त करणे, असे उपक्रम आम्ही राबवित आहोत.**

**समृध्द कोकण अभियानाला काही मान्यवरांचे विशेष पाठबळ लाभले, या मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे संघटना मजबूत बनली. पक्ष विरहीत समृध्द कोकण अभियानाला सर्व पक्षीय कोकणी नेत्यांचे सहकार्य मिळत आहे.**

• **कोकण भूमी प्रतिष्ठान :-** कोकणातील कर्तृत्ववान व्यक्तींना, नवयुवकांना एकाच व्यासपीठावर आणणे, निसर्ग समृध्द कोकणाला आर्थिक समृध्द करण्यासाठी सुरु झालेली चळवळ म्हणजे समृध्द कोकण अभियान मागील १० वर्षात कोकण विकासाची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. या विकासाच्या प्रक्रियेत स्थानिक कोकणवासीय / भूमिपुत्रांनी सहभागी व्हावे, यासाठी कोकण व्हिजन परिषदा, विविध संमेलने प्रशिक्षण शिबीर, अभ्यासदौरे या कार्यक्रमातून कोकणवासियांची मानसिकता बदलणे, त्यांना प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीसाठी उद्युक्त करण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जातो.

• **ग्लोबल कोकण :-** कोकण पर्यटनाची आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी करणारा हा एकमेव महोत्सव. कोकणातील निसर्ग, पर्यटन स्थळे, संस्कृती, लोककला, खाद्यपदार्थ यांना जागतिक व्यासपीठ मिळावे म्हणून ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव सुरु करण्यात आला. गेली ५ वर्ष या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ५०० उद्योजक या महोत्सवात सहभागी होतात. **५० कोटींची आर्थिक उलाढाल होते. या महोत्सवाने कोकण पर्यटनाचा जागतिक ब्रॅण्ड तयार झाला.** महोत्सवामध्ये दरवर्षी केंद्रीय मंत्री, राज्याचे मंत्री यांचा सहभाग असतो. WTM लंडन, ITB बर्लिन, जपान या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात ग्लोबल कोकणचा पर्यटन ब्रॅण्ड विकसित झाला. आता देशभरात होणाऱ्या पर्यटन प्रदर्शनात सहभागी होऊन पर्यटनाचा ब्रॅण्ड विकसित करणार.

• **कोकण व्हिजन :-** कोकण विकासात महत्त्वाच्या ठरणाऱ्या विषयावर कोकण व्हिजन २०२० या परिषदेत सांगोपांग चर्चा करण्यात येते. या परिषदेतील व्यक्त झालेली मते व १०० हून अधिक तज्ज्ञांच्या मदतीने प्रतिष्ठानचे मार्गदर्शन व **माजी मुख्य सचिव मा. द.म.सुकथनकर** यांच्या मार्गदर्शनाखाली व्हिजन आराखडा तयार केला. पायाभूत सुविधा, बंदर विकास पर्यटन या त्रिसूत्रीला प्राधान्य देण्याची सूचना करण्यात आली. या अभियानात मांडलेल्या अनेक विषयामध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. **उदा. मुंबई - गोवा महामार्गाचा चौपदरीकरण, नॅशनल हायवे ६६ म्हणून मान्यता, मरिन युनिव्हर्सिटी, ग्रामीण पर्यटन विकासासाठी दरवर्षी ५० कोटी कोकणातील बंदराचा विकास, मत्स्य बीज केंद्र, पर्यटन क्षेत्री पायाभूत सुविधा विकास. आता समृध्द कोकण अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्याचा विकास आराखडा बनविण्यात येणार आहे.**

• **कोकण पर्यटन उद्योग संघ :-** शासनाच्या नवीन कोकण पर्यटन विकास धोरणामुळे कोकणात पर्यटन व्यवसायामध्ये मोठ्या संधी निर्माण होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोकण पर्यटन उद्योग संघाची स्थापना करण्यात आली. कोकणातील पर्यटन व्यावसायिकांची ही संघटना आहे. संघटनेच्या प्रत्येक तालुक्यात शाखा सुरु होत आहे. सदस्यांच्या पुढाकाराने व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कोकणातील पर्यटनदृष्टया महत्त्वाच्या ५० गावांचा आंतरराष्ट्रीय मानांकनाप्रमाणे विकास करण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे. **राज्य शासनाने यावर्षीच्या अर्थसंकल्पात १७४ कोटीची तरतूद पर्यटनदृष्टया महत्त्वाचा गावातील पायाभूत सुविधेसाठी केली.**

• **कोकण भूमी कृषी पर्यटन सहकारी संस्था :-** निसर्ग, पर्यावरण, ग्रामीण जीवन, लोककला हे समजून घेण्यासाठी पर्यटकांनी कोकणात यावे. त्यांना कृषी - ग्रामीण जीवनाचा अनुभव देणारी केंद्रे गावागावात सुरु व्हावीत. असा प्रयत्न कोकण भूमी कृषी पर्यटन सहकारी संस्था करते. प्रतिष्ठानच्या माध्यमातून १०० हून अधिक कृषी पर्यटनाची केंद्रे कोकणात सुरु झाली आहे.

• **जलसमृध्द कोकण प्रतिष्ठान :-** कोकणातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी जलसमृध्द कोकण प्रतिष्ठान या फाऊंडेशनची निर्मिती करण्यात येत आहे. कोकणातील ज्या ग्रामस्थांनी स्वतःच्या गावात लोकचळवळीतून, श्रमदानाने नद्यांतील गाळ काढणे, नदी खोलीकरण, बंधारा बांधणे यासारखी जलव्यवस्थापनाची कामे केली आहेत. त्यांना सहकार्य करण्याचे काम हे फाऊंडेशन करणार आहे.

• **जीवन शिक्षण प्रबोधिनी :-** फलोद्यान, फळप्रक्रिया, आधुनिक शेती, मत्स्यसंवर्धन, पर्यटन, कृषी पर्यटन, पशुपालन या विकासाच्या विषयातील, व्यवसायाच्या संधीचे माहिती देणारे शिक्षण म्हणजे जीवन शिक्षण. कोकण विकासाच्या विषयासंदर्भात दर महिन्याला प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. आतापर्यंत २००० लोकांनी प्रशिक्षण व अभ्यासदौऱ्यात सहभाग घेतला असून ५०० लोकांनी प्रकल्प सुरु केले आहेत. ज्या कोकणवासियांना प्रकल्प सुरु करायचे आहेत त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. शासकीय, प्रशासकीय अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येते.

## परिषदा व अभ्यासदौरा


जल परिषद, मुंबई




अभ्यासदौरा

## कोकण व्हिजन २०२०


ॲडव्हान्टेज कोकण - मुंबई


कोकण विकास यात्रा
डहाणू ते वेंगुर्ला
१४ ते १८ ऑगस्ट २००९



कोकण व्हिजन २०२०,दापोली
२८ ऑक्टोबर २००७

## ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव















## कोकण ग्लोबल : कोकणची आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी








मँगो फेस्टीव्हल (लंडन) २०१३

आय.टी.बी (बर्लिन) पर्यटन प्रदर्शन २०१४

## पर्यटन फेस्टीव्हल


सागरेश्वर बिच फेस्टीव्हल
२६ ते २७ जानेवारी २००७


गणपतीपुळे बिच फेस्टीव्हल (गणपतीपुळे)
२३ ते ३१ डिसेंबर २००६


श्रीवर्धन बिच फेस्टीव्हल


गुहागर बिच फेस्टीव्हल
२३ ते २५ डिसेंबर २०११


सह्याद्री महोत्सव, आंबवली(खेड)
३० डिसेंबर २०११ ते ०१ जानेवारी २०१२


हापूस पर्यटन महोत्सव (महाड - नाते)
१९ ते २० एप्रिल २०१३


चिकू महोत्सव (डहाणू)
०१ व ०२ फेब्रुवारी २०१४

## कोकण पर्यटन उद्योग संघ आयोजित कोकण पर्यटन व्हिजन परिषद








## कोकण जलपरिक्रमा








## जलसमृध्द कोकण अभियान


जगबुडी नदी, खेड (रत्नागिरी)


अर्जुना नदी, राजापूर(रत्नागिरी)


गांधारी नदी, रायगड


साखर नदी, खेड

# समृध्द कोकण... उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल

• **ग्रामीण पर्यटन :-** कोकणचा पर्यटनदृष्टया विकास करताना गावागावात पर्यटक यावेत. पर्यटन विकासात ग्रामस्थांचा सहभाग असावा. या उद्देशाने ग्रामीण पर्यटन विकासाचा प्रस्ताव प्रतिष्ठानने **माजी मुख्य सचिव मा. अरुण बोंगिरवार** यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाला सादर केला. तत्कालीन शासनाने या प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी समिती गठीत केली. या समितीत प्रतिष्ठानचा समावेश केला. ग्रामीण पर्यटनास चालना देण्यासाठी कोकण पर्यटन विकास कार्यक्रम हा लेखाशीर्ष तयार झाला. यासाठी अर्थसंकल्पात दरवर्षी ५० कोटी रुपयांची तरतूद झाली. हे कोकण भूमी प्रतिष्ठानचे सर्वात मोठे यश आहे. या योजनेतंर्गत १०० हून अधिक गाव १० वर्षात विकसित होणार आहेत. या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

• **नदी पुनर्जीवन अभियान :- गांधारी, जगबुडी, अर्जुना, जानवली या नद्यांच्या पुनर्जीवनासाठी शासनाने २२५.१४ कोटींचा आराखडा बनवला आहे.** या दत्तक घेतलेल्या नद्यांवर लोकचळवळीतून श्रमदानाने, गाळ काढणे, छोटे बंधारे बांधणे आदी कामे करण्यात आली. **यावर्षी चार नद्यांसाठी २० कोटींचा निधी मंजूर झाला.** या अभियानामुळे कोकणात पाणी प्रश्नी जनचळवळ उभी राहिली. गावागावात नद्या, नाले, तलाव यांच्यातील गाळ उपसा करुन आवश्यक बंधारे बांधून पाणी अडविण्यात येत आहे. शासनाच्या माध्यमातून जल समृध्द अभियान ही योजना राबवीत आहे.

• **कोकण व्हिजन २०२५ :-** कृषी, फलोद्यान, फळप्रक्रिया, पर्यटन, कृषी पर्यटन, मत्स्य या विषयांच्या परिषदांचे आयोजन गेली १५ वर्ष प्रतिष्ठान करत आहे. या परिषदेत विकासाच्या विषयाचे मार्गदर्शन करुन माहिती दिली जाते. कोकणवासियांनी जमिनी न विकता प्रकल्प सुरु करण्याची मानसिकता तयार केली जाते. या परिषदांमध्ये २५ हजाराहून अधिक कोकणवासियांनी सहभाग घेतला.

• **प्रशिक्षण :-** कोकण विकासाच्या विविध विषयावर प्रशिक्षण आयोजित करुन कुशल मनुष्यबळ निर्माण करणे. प्रशिक्षण देऊन उद्योजक घडविणे हा उद्देश आहे. प्रतिष्ठानच्या कार्यक्रमातून प्रेरणा घेऊन ५०० हून अधिक प्रकल्प सुरु झाले आहेत.

• **जलसमृध्द कोकण अभियान :-** कोकण जलचेतना कार्यक्रमात गांधारी, जगबुडी, अर्जुना, जानवली नद्या दत्तक घेण्यात आल्या. या नद्यांवर पुनर्जीवन अभियान राबविण्यात येत आहे. या चारही नद्यांमधील गाळ काढणे, पात्राचे खोलीकरण आणि रुंदीकरण करणे, नदी किनारी बांध घालणे, आवश्यक त्या ठिकाणी बंधारे घालून पाणी अडविणे. या पाण्यावर आधुनिक सामुदायिक शेती करुन गाव समृध्द बनविणे. यासाठी जलसमृध्द कोकण अभियान राबविण्यात येत आहे. या कामासाठी नदीचा रोडमॅप तयार होत असून नदी पुनर्रचना कार्यक्रमासाठी, जिल्हा तालुका, गाव स्तरावर नदी समिती बनविण्यात येत आहे. या समितीच्या समन्वयातून नवीन कामांची रुपरेषा ठरविणे, नदीचे व्हिजन डॉक्युमेंट बनविणे, निधी संकलन करणे, ग्रामस्थांनी श्रमदान करणे ही कामे पुढील काळात करण्यात येणार आहेत. आपल्या गावातील नदीच्या पुनर्जीवनासाठी आणि गाव विकासासाठी त्या - त्या विषयांच्या विविध समित्या बनविण्यात आल्या आहेत. या समितीची कामे निश्चित करण्यात येत असून त्याप्रमाणे गावचा / नदीचा विकास करण्यात येणार आहे.

• **पर्यटन :-** निसर्ग सुंदर कोकणात पर्यटकांनी यावे. येथील कला, संस्कृती पहावी यासाठी कोकण भूमी प्रतिष्ठानतर्फे विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. कोकणातील गावा-गावात पर्यटकांनी यावे असा कोकण भूमीचा प्रयत्न आहे. बीच फेस्टीव्हल, बॅकवॉटर्स फेस्टीव्हल, सह्याद्री फेस्टीव्हल, कृषी - ग्रामीण पर्यटन, आंबा व चिकू महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या विविध महोत्सवामुळे एक कोटीहून अधीक पर्यटक दरवर्षी कोकणात येतात. पर्यटकांसाठी नवनवीन हॉटेल, कृषी पर्यटन केंद्रे सुरु झाली. **प्रतिष्ठानने वॉटर्सस्पोटर्स पॉलिसी तयार करुन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डला सादर केली. एमएमबी ने या नियमावलीस मान्यता दिली. यामुळे १०० हून अधीक वॉटरस्पोर्टस् केंद्रे सुरु झाली.**

• **समृध्द कोकण मत्स्य उद्योग संघ :-** कोकणातील छोटया-मोठया मत्स्य व्यावसायिकांचे प्रश्न सोडविणे, त्यांना मार्गदर्शन करणे. शासनाकडे मत्स्य व्यावसायिकांच्या प्रश्नासंदर्भात पाठपुरावा करणे हा उद्देश आहे. **या वर्षीच्या अर्थसंकल्पात ९ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मत्स्य हॅचरीसाठी शासनाने मंजूर केला. हॅचरीच्या मागणीसाठी पाठपुरावा करण्यात आला होता.**

**समृध्द कोकण अभियानात स्वच्छेने सहभागी झालेला सदस्य म्हणजे कोकण दूत. अभियानाची मूल्ये, विचार, विनिमय, कोकणवासियांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यरत असलेला सक्रीय कार्यकर्ता म्हणजे कोकण सेवक.**

समृध्द कोकण हे कोकणच्या सर्वांगीण विकासाचे अभियान आहे. मुंबई, पुणे, जगभरातील व कोकणातील कोकणवासियांनी एकत्र येऊन, देशातील सर्वात समृध्द प्रदेशाची निर्मिती करावी, म्हणून **कोकण उद्योजक प्रतिष्ठान - समृध्द कोकण** या संस्थेची निर्मिती झाली आहे. कोकणवासियांनी निसर्ग समृध्द कोकणातील आपल्या जमिनी न विकता. त्या विकसित कराव्यात. गावागावात, रोजगार - स्वयंरोजगाराचे प्रकल्प उभारावेत, ही या अभियानाची मुख्य संकल्पना आहे.

**पाणी, पर्यटन, प्रगत शेती, फलोद्यान व प्रक्रिया, मत्स्योद्योग, पर्यावरण आणि प्रशिक्षण ही आपली कोकण विकासाची सप्तसुत्री आहे. कोकणातील नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करुन एका समृध्द प्रदेशाची निर्मिती हे आपले साध्य आहे.**

USA पासून ऑस्ट्रेलियापर्यंत, मुंबई -पुणे या शहरापासून, डहाणू ते वेंगुर्ला येथील सर्व कर्तृत्ववान कोकणवासीय व तरुण यांच व्यासपीठ म्हणजे समृध्द कोकण. जात-पात, पंथ-भेद-पक्ष हे सर्व विसरुन सर्व कर्तृत्ववान कोकणवासियांनी एकत्र यावे व कोकण विकासासाठी प्रत्यक्ष कृती करावी, एकमेकांना सहकार्य करुन कोकणाचा विकास करावा. याकरिता संघटीत अभियान सुरु झाले आहे.

**कोकण दूतचे कार्य :-**

- तालुक्यातील उद्योजक, तज्ज्ञ, मान्यवर शेतकरी, तरुण व कर्तृत्ववान कोकणवासिय यांचे संघटन करणे.
- कोकणवासियांनी जमिनी विकू नयेत यासाठी प्रयत्न करणे.
- या जमिनीत विकासाचे प्रकल्प उभे रहावेत यासाठी प्रयत्न करणे.
- तालुक्यात जलसंवर्धनाची कामे करणे. नदी, ओढे यातील गाळ काढणे, बंधारे बांधणे, नदी समृध्दी अभियानात सहभागी होणे.
- तालुक्यात उत्पादित होणाऱ्या शेती मालावर प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी प्रयत्न
- तालुक्याच्या टिममध्ये सहभागी होऊन व्हिजन डॉक्यूमेंट तयार करणे. भविष्यात प्रत्येक गावाचा विकास आराखडा बनविणे. समृध्द गाव संकल्पना राबविणे.
- प्रत्येक तालुक्यात पर्यटन महोत्सवाचे आयोजन करणे.
- तालुक्यातील प्रशासन व्यवस्थेबरोबर समन्वय साधणे.
- सरकारी योजनांची माहिती कोकणवासियांनी देणे.
- समृध्द कोकण आयोजित कृषी पर्यटन, शेळीपालन, गो पालन, सेंद्रीय शेती, पशुपालन, मत्स्यशेती, अन्न व फळप्रक्रिया उद्योगांचे प्रशिक्षणात सहभागी होणे.

**कार्यक्रम**

| मुंबई | तालुका |
|---|---|
| •**ग्लोबल कोकण आंतरराष्ट्रीय महोत्सव.** | •**दरमहा सभासद बैठक** - प्रत्यक्ष प्रकल्पांवर बैठक चर्चा |
| •**WTM लंडन, ITB बर्लिन आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रदर्शनात सहभाग.** | •**दरमहा प्रशिक्षण** - (उदा. कृषी पर्यटन, गो-शेळी पालन, सेंद्रीय शेती, खेकडा प्रशिक्षण, मत्स्यशेती, हाय-टेक फार्म, अन्न व फळप्रक्रिया.) |
| •दरमहा प्रशिक्षण :- (उदा. कृषी पर्यटन, गो-शेळी पालन, सेंद्रीय शेती, खेकडा प्रशिक्षण, मत्स्यशेती, हाय-टेक फार्म, अन्न व फळप्रक्रिया.) | •**व्यवसाय मार्गदर्शक शिबीर** - दोन किंवा तीन महिन्यातून एकदा. |
| •**दरमहा अभ्यासदौरा** - (उदा. सामुदायिक शेती, कृषी पर्यटन, समृध्द कोकण मत्स्य प्रशिक्षण केंद्र, आंबा प्रकल्प भेट.) | •नदी पुनजीर्वन व जलसमृध्द गाव अभियान तालुक्यात राबवणे (चर मारणे, गाळ काढणे, बंधारा बांधणे, प्रगत शेती करणे.) |
| •**पर्यटन महोत्सव** - (कृषी -ग्रामीण पर्यटन, बीच फेस्टीव्हल, सह्याद्री फेस्टीव्हल, बॅकवाटर्स.) | •**पर्यटन महोत्सव** - दरवर्षी आपल्या तालुक्याची व पर्यटनाची प्रसिध्दी करणारा पर्यटन महोत्सव तालुका स्तरावर राबविणे. |
| •**विशेष परिषदा** - (कोकण व्हिजन, पर्यटन, पायाभूत सुविधा.) | |

**संपर्क समन्वय - समृध्द कोकणच्या मुंबई कार्यालयात प्रकल्प उभारणीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहे. प्रकल्प चालकांनी आपल्या समस्या येथे मांडाव्या: f kokanclub फोन: ०२२-२४३२१३६९ / २४१५५४१२**
**ई-मेल : infokokanclub@gmail.com वेबसाईड : www.kokanclub.org / www.globalkokan.org**

## ~ प्रतिज्ञा ~

सुवर्णभूमी कोकणच्या मातीवर आम्ही प्रेम करतो,
इथली शेती, इथली माती, इथली नाती, इथली संस्कृती
यांच्याशी आमची बांधिलकी आहे.

आणि म्हणून आम्ही फलोद्यान, आधुनिक शेती,
कृषि पर्यटन, फळप्रक्रिया असे प्रकल्प उभारू,
यासाठी आम्ही एकमेकांना सहकार्य करू.

रोजगारांच्या चांगल्या प्रकल्पाचे स्वागत करू,
मात्र पर्यावरणाचा ऱ्हास करणारे प्रकल्प,
आम्ही कोकणात येऊ देणार नाही,

आम्ही आमची मानसिकता बदलू,
कोकणचा विकास आम्हीच करू,
या विकासात शासनाला ही सहभागी होण्यासाठी भाग पाडू,

भारतभूमीला बलशाली करणारे समृद्ध कोकण
आम्ही निर्माण करू,
कोकणवासियांचा व कोकणच्या सर्वांगिण विकासासाठी
संघटित होण्याचा आम्ही संकल्प करीत आहोत.

## मुख्य मार्गदर्शक

**डॉ. राजेंद्रसिंह**
रॅमन मॅगसेसे व स्टॉक होम
वॉटर प्राईझ विजेते
मार्गदर्शक, कोकण भूमी प्रतिष्ठान

**द. म. सुकथनकर**
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
संस्थापक मार्गदर्शक
कोकण भूमी प्रतिष्ठान

**अरुण बोंगिरवार**
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
संस्थापक मार्गदर्शक,
कोकण भूमी प्रतिष्ठान

## संस्थापक

**संजय यादवराव**
प्रमुख कार्यवाहक, कोकण भूमी प्रतिष्ठान
प्रमुख कार्यवाहक, ग्लोबल कोकण
अध्यक्ष, समृध्द कोकण
प्रमुख कार्यवाहक, कोकण पर्यटन उद्योग संघ

## मार्गदर्शक

**आशिषजी शेलार**, आमदार
स्वागताध्यक्ष, ग्लोबल कोकण

**भाई जगताप**, आमदार
कार्याध्यक्ष, ग्लोबल कोकण

**अरविंद सावंत**
खासदार

**राजीवजी पाटील**
प्रथम महापौर, वसई-विरार

**प्रसादजी लाड**
उद्योजक

**प्रमोदजी जठार**
संचालक

**जगन्नाथजी शिंदे**
आमदार

**किरण पावसकर**
आमदार

**बी. व्ही. देसाई**
उद्योजक

## संचालक

**अनंत भालेकर**
कार्याध्यक्ष
मराठी व्यापारी मित्र मंडळ

**रविंद्र प्रभूदेसाई**
अध्यक्ष, पितांबरी

**किशोरभाई धारिया**
अध्यक्ष, हिरवळ

**राजश्री यादवराव**
मुख्य समन्वयक

**राजेंद्र सावंत**
निर्माण ग्रुप

**अजित मराठे**
निर्माण ग्रुप

**मनोहर सकपाळ**
अध्यक्ष,
भागिरथी ट्रान्स कार्पो. लि.

**तुषार खेतल**
उद्योजक

**गणेश यादव**
अध्यक्ष, वंदन इंटेरीयर्स

**अनिल आयरे**
संचालक

**नरेंद्र बामणे**
उद्योजक

**डॉ. उमेश मुंडल्ये**
जलतज्ज्ञ

**डॉ. विवेकानंद सावंत**
उद्योजकता विकास तज्ज्ञ

**अरविंद दळवी**
उद्योजक

**कृष्णा कोबनाक**
उद्योजक

## कोकण पर्यटन उद्योग संघ - कार्यकारिणी

**माधव भांडारी**
अध्यक्ष

**प्रभाकर सावे**
उपाध्यक्ष

**नरेश पेडणेकर**
उपाध्यक्ष

**विजय चव्हाण**
समन्वयक

**प्रविण मुळीक**
समन्वयक

**योगेश आंब्रे**
समन्वयक

## उद्योजक मार्गदर्शक

**हसन चौगुले**
उद्योजक, कतार

**शेखर निकम**
कार्याध्यक्ष, सह्याद्री शिक्षण संस्था

**दिलीप बाईंग**
अध्यक्ष, काताळे शिपयार्ड प्रा. लि.

**इंद्रजित सावंत**
उद्योजक

**श्रीराम दांडेकर**
कॅम्लिन कंपनी

**दिपक परब**
उद्योजक

**पप्पुशेठ पाटील**
उद्योजक

**डॉ. झहीर काझी**
चेअरमन, अंजुमन इस्लाम

**जगन्नाथ मोरे**
उद्योजक

**दिनेश शिर्के**
उद्योजक

**शशांक सांडू**
सांडू ब्रदर्स

**प्रमोद भोसले**
अध्यक्ष, शिवम परिवार

**अविनाश चाळके**
उद्योजक

**ॲड. हर्षद भडबडे**
कायदेतज्ञ

**प्रकाश तांबोस्कर**
संचालक, पॉवरटेल सर्व्हिस

**श्रीकांत सावे**
संचालक, हिलझिल रिसॉर्ट

**प्रदिप शिर्के**
अध्यक्ष, कोकण सृष्टी डेव्हलपर्स

**ललित महाडेश्वर**
उद्योजक, U.S.A.

**नितीन नेरुरकर**
अध्यक्ष, मांगरीश ग्रुप

**प्रमोद पवार**
अभिनेता

**शशिकांत पेडणेकर**
अध्यक्ष, न्यू मॅक्स ग्रुप

## समृध्द कोकण - कार्यकारिणी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| संतोष कामेरकर | किरण खानोलकर | ललित जाधव | संदीप अध्यापक | गजानन साळवी | अजय यादवराव |
| वासुदेव तुळसणकर | संदेश चिकणे | अवधूत चव्हाण | तानाजी मोरे | ओमकार गिरकर | दिप्तेश थेराडे |
| मधुकर पराडकर | रमेश नागावकर | अशोक करंगुटकर | रवि परब | विजय धामापूरकर | राम कोळवणकर |
| ॲड. हर्षद साळवी | भूषण सावे | मिनल ओक | इफ्तिकार चरफरे | संतोष नलावडे | संतोष जैतापकर |
| प्रमोद शिंदे | मिलिंद कांबळी | सुनिल लाड | रोहित पाटील | चंद्रकांत महाडिक | प्रकाश पाटील |
| सुशांत मोरे | देवीदास केणी | भालचंद्र जाधव | प्रफुल्ल सुर्वे | प्रशांत कांबळे | सुधाकर होलम |
| शिरिष टावरे | किशोर शेलवले | सुचेता मोरे | रमेश पाटील | नवल शेवाळे | अनिकेत वाडेकर |
| जगजीवन कांबळे | शशिकांत तोरस्कर | सचिन चव्हाण | अशोक उतेकर | अमित गोखले | प्रविण पडयाळ |


**कार्यालय ऑफिस :-** ऑफिस नं. २५-२६, अजय शॉपिंग सेंटर, टी.एच.कटारिया मार्ग, माटुंगा रोड (प.), मुंबई - १६
फोन: ०२२-२४३२४२६० / २४१५५४१२ / २४१५५४१३ वेबसाईड : www.kokanclub.org / www.globalkokan.org
ई-मेल : infokokanclub@gmail.com / kokanbhumi@gmail.com